# हिंगोली जिल्हा पोलीस वार्तापत्र

## पोलीस अधीक्षक कार्यालय,हिंगोली.

## दिनांक १२.०१.२०२३

**अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणारे वाहन चालकावर कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयात दि. ११/०१/२०२३ रोजी अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या १५३ वाहन चालका विरूध्द कार्यवाही करण्यात आली असुन त्यांचे कडुन ८१,६००/— रूपये दंड वसुल करण्यात आला आहे.

**जुगार सदराखाली विशेष मोहिम अंतर्गत कार्यवाही. :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये जुगार खेळणाऱ्या विरूध्द दि.११/०१/२०२३ रोजी जुगार कायद्या अंतर्गत जिल्हयात एकुण ०३ ठिकाणी छापा टाकुन आरोपी विरूध्द कार्यवाही करून त्यांचेकडुन जुगाराचे साहित्य व नगदी असा एकुण ६१,३००/—रूपये जप्त करण्यात आला असुन आरोपीतांविरूध्द जुगार कायद्या अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात येवुन पुढील तपास करण्यात येत आहे.

**दारूबंदी सदराखाली विशेष मोहित अंतर्गत कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये अवैध दारू विक्री अंतर्गत दि. ११/०१/२०२३ रोजी दारूबंदी कायदया अंतर्गत हिंगोली जिल्हयामध्ये एकुण ०४ ठिकाणी छापा मारूण कार्यवाही करून आरोपीतांनकडुन २७.७१ लिटर दारू असा एकुण ६,४८०/—रू.किमतीचा मुददेमाल जप्त करण्यात आला असुन आरोपीतां विरूध्द दारूबंदी कायदयाअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात येवुन पुढील तपास करण्यात येत आहे.

**मरणास कारणीभुत असणा—या विरूध्द अपराध दाखल गुन्हे:—**

दि. ११/०१/२०२३ रोजी पोस्टे कुरूंदा येथे कलम २७९,३०४(अ) भादवी अन्वये गुन्हा दाखल असुन यातील आरोपीतांने त्याचे ताब्यातील मो.सा.क्र..एम.एच.२६ बि.यु.६७८२ च्या चालकाने त्याच्या ताब्यातील मोटार सायकल भरधाव वेगात व निष्काळाजीपणे चालवुन फिर्यादीचे पती बसुन जात असलेल्या मो.सा.ला पाठीमागुन जोराची धडक देवुन फिर्यादीचे पतीस गंभीर जख्मी करून मरणास कारणीभुत झाला म्हणुन गुन्हा दाखल होवुन संदर्भात पोलीस तपास करित आहेत.